THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 17TH SEPTEMBER 1896.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

# PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. सन १८९९ च्या ३ ऱ्या आक्टाच्या ७ व्या कलमावरून सुधारलेल्या सदहू आक्टाच्या ६६ व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे, ह्मणजे :—

सन १८६६ चा आक्ट १४, कलम ६६, याच्या नंतर नवीन कलम वाढविणें.

" ६७. ज्या पत्रावर, पार्सेलावर किंवा इतर जिनसावर कोणतीहि कस्टमची ड्यूटी भरावयाची असेल असें पत्र, पार्सेल किंवा इतर जिनस ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दींबाहेरील कोणत्याहि ठिकाणाहून आली असून अशी ड्यूटी कोणत्याहि कस्टमच्या वंदरीं किंवा इतर ठिकाणीं पोस्टाच्या अधिकाऱ्यांनीं भरली असेल तेव्हां अशा ड्यूटीची रकम, पोस्टाचें हांशील ज्या रीतीनें वसूल करण्याचा अधिकार आहे त्याच रीतीनें, ह्या आक्टाअन्वयें वसूल केली पाहिजे."

पोस्टाच्या अधिकाऱ्यांनीं भरलेली कस्टमची ड्यूटी वसूल करण्याबाबद.

---

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

बाहेरून येऊन पोहोंचणाऱ्या जिनसांवर येणें असलेली कोणतीही कस्टमची ड्यूटी वसूल झाल्याशिवाय त्या वस्तु कस्टम खात्याचे अमलदार सोडूं शकत नसल्यामुळें पोस्ट आफिसाचा असा रिवाज आहे कीं बाहेरून मेलबरोबर आलेल्या जिनसांवर घ्यावयाची कस्टमची ड्यूटी भरून तिची रकम, सदहू जिनसा ज्या मनुष्यांच्या नांवांवर आलेल्या असतील त्या मनुष्यांच्या स्वाधीन त्या करतांना, पोस्टाच्या हांशिलाप्रमाणें, वसूल करावी. परंतु याप्रमाणें वसूल करण्याचा पोस्टाच्या अधिकाऱ्यांना कायदेशीर अख्त्यार नाहीं, व असे प्रसंग घडून आले आहेत कीं ज्यांच्या नांवांवर जिनसा आल्या त्यांनीं त्या जिनसा आपल्या स्वाधीन घेऊनहि ड्यूटीची रकम देण्याचें नाकारलें आहे. अशी स्थिती खरोखर चालू राहूं देतां कामा नये, व ह्या मसुद्याचा हेतु ह्मटला ह्मणजे, हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट ( सन १८६६ चा १४ वा ) पसार झाल्याच्या तारखेस ध्यानीं नव्हतें अशा प्रकारचें काम करण्याचें पोस्ट आफिसानें पत्करल्याच्या कारणानें जो ठराव करणें जरूर झालें आहे तो ठराव सदहू आक्टांत दाखल करणें हा होय.

तारीख १९ माहे आगस्ट, सन १८९६.

(सही) जे. वेस्टलंड.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.